## निशाणी क्र. ०४ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज अर्जदार पिडीत महिलेने स्वत: करीता व तिची मुलगी मैथीली करीता गैरअर्जदार क्र. १ याचे कडुन कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम अनुतोष/खावटी मिळण्यासाठी सादर केलेला आहे.

### अर्जदाराची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :—

२. अर्जदाराने निशाणी क्र. १ वरील अर्जामध्ये नमुद केलेला संपूर्ण मजकुर हा या अर्जाचा भाग समजण्यात यावा असे नमुद करून अर्जदाराचे पुढील कथन असे आहे की, अर्जदार ही मुलीसह वेदांत रेसिड्न्सी, रिसोड येथे नाईलाजास्तव राहत आहे. तिचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हिने केलेला अर्ज निकाली लागण्याकरीता बराच कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीमध्ये तिला उदरनिर्वाहाकरिता अन्न—वस्त्र—निवारा, औषधोपचाराकरिता तसेच, वि. न्यायालयात सदर्हू प्रकरण चालविण्याकरिता लागणारा खर्च अर्जदार ही करू शकत नाही. तिचेकडे उत्पन्नाचे साधन नाही. उलटपक्षी, गैरअर्जदारकडे उत्पन्नाचे भरपुर साधन असुन अर्जदार व तिचे मुलीचा संपूर्णपणे सांभाळ करण्याची जबाबदारी ही गैरअर्जदार क्र. १ ची असल्यामुळे गैरअर्जदार क्र. १ कडुन अर्जदार हिला दरमहा रुपये २५,०००/— व तिची मुलगी नामे कु. मैथीली हिला दरमहा रुपये २५,०००/— अशी एकुण दरमहा रुपये ५०,०००/— अंतरिम खावटीची मागणी प्रस्तुत अर्जाव्दारे केलेली आहे.

३. गैरअर्जदाराने अर्जाच्या पाठीमागील बाजुस प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन त्यांनी निशाणी क्र. १ वरील अर्जास दिलेला जबाब हा प्रस्तुत अर्जाचा जबाब समजण्यात यावा असे म्हणणे मांडले आहे, तसेच अर्जदार हिचे पगारपत्रक बोलविणेबाबत अर्ज दिला आहे, अर्जदार ही नौकरीवर असुन तिला दरमहा पगार मिळतो, करीता अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचे दाखल कागदपत्रे पाहिले. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे तरतुदींचा विचार करता खालील वादप्रश्न उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष त्यापुढे नोंदविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१)** | अर्जात मागितलेला अंतरिम अनुतोष/खावटी मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी** रक्कम रुपये ४,५००/– प्रतिमहा |
| **२)** | आदेश काय? | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. |

## <u>**कारणमिंमासा**</u>

५. अर्जदाराच्या वतीने गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केलेला असून ती स्वत:ची उपजिवीका करण्यास असमर्थ आहे तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार क्र. १ हा अंतरिम निर्वाह भत्ता देण्यास सक्षम आहे. अर्जदारावर तिचे लहान मुलीच्या पालन पोषणाची व शिक्षणाची जबाबदारी आहे. गैरअर्जदार क्र. १ हा वैदयकिय व्यवसाय व ईतर शेती, प्लॉट या माध्यमातून त्यास पुरेसे उत्पन्न मिळते असा अर्जातील मजकुरा अनुषंगे युक्तीवाद करुन प्रकरणाचा निकालासाठी बराच कालावधी लागणार असल्याने प्रस्तुत अंतरिम खावटीचा अर्ज मंजुर करावा असे प्रतिपादन केले आहे.व मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या पुढील न्याय निवाडयाचा आधार घेतला आहे. <u>**मा. सर्वोच्च न्यायालय यांचे शैलजा व ईतर वि. खोबन्ना, निकाल दि. १८/०१/२०१७ (ए.आय.आर सर्वोच्च न्यायालय ११७४)**</u> *प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये असे मत नोंदविले आहे की, ''फौजदारी प्रकिया संहिता कलम १२५ नुसार मंजुर केलेली खावटीची रक्कम ही पत्नी ही कमावती असल्याने कमी करण्यास पुरेसे कारण नाही.'' तसेच* <u>***मा. राजस्थान उच्च न्यायालय यांचे नेहा माथुर वि. अरविंद किशारे, नि.ता. २६/०५/२०२२ (ए.आय.आर ऑनलाईन २०२२ आर.ए.जे. १४०),***</u> *या* न्यायनिर्णयामध्ये ''पतीने घटस्फोटाचा बचाव घेतला असला व पत्नी कमावती असेल तरी तिला दरमहा वाढीव खावटी मिळण्यास अपात्र ठरु शकत नाही'' असे निरिक्षण नोंदविलेले आहे. <u>**मा. सर्वोच्च न्यायालय यांचे चतुरभुज वि. सिताबाई, नि.ता. २७/११/२००७ (ए.आय.आर २००८ सर्वोच्च न्यायालय ५३०),**</u> प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये '' फौजदारी प्रकिया संहिताचे कलम १२५ नुसार खावटी मिळणेसाठी पतीने पत्नीला सांभळण्यास दर्लक्ष करणे व पतीकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन

आहे या दोन बाबी शाबीत करण्याची जबाबदारी पत्नीवर असल्याचे तसेच पत्नीचे वैयतिक उत्पन्न हे अपुरे असेल्याचे शाबीत करणे आवश्यक आहे असे निरिक्षण नोंदविलेले आहे.'' तसेच **<u>मा. सर्वोच्च न्यायालय यांचे सुनिता कचवाह व ईतर वि. अनिल कचवाह, नि.ता २८/१०/२०१४ (ए.आय.आर २०१५ सर्वोच्च न्यायालय ५५४),</u>** प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये ''पत्नी काही उत्पन्न मिळवित असेल तर सदर कारण खावटीचा अर्ज नामंजुर करण्यास पुरेसे कारण होणार नाही'' असे मत नोंदविलेले आहे व **<u>मा. सर्वोच्च न्यायालय यांचे संजय दामोदर काळे वि. कल्याणी संजय काळे, नि.ता २६/०५/२०२०(ए.आय.आर ऑनलाईन २०२० बॉ. ६२७),</u>** *प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये ''सहमतीने घटस्फोट झाला असेल व त्यांच्यातील करार हा कायदयाच्या तरतुदी हिरावून घेणारे व सार्वजनिक धोरणाविरोधात असेल तर पत्नी ही खावटी मिळण्यास पात्र आहे'' असे मत नोंदविलेले आहे.*

६. याउलट, गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केलेला नसून ती स्वतःच्या मर्जीने माहेरी राहत आहे, ती स्वतःचा व मुलीचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे तसेच, तिने वस्तुस्थिती लपवून ठेवून प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. ती आरोग्य अधिकारी म्हणून मौजे मालेगांव येथे नोकरीस असुन तिला पुरेसे उत्पन्नाचे साधन आहे. गैरअर्जदार क्र. १ यास उत्पन्नाचे साधन नाही तो बेरोजगार आहे असे प्रतिपादन करुन त्याच्या लेखी जबाबामधील मजकुराअनुषंगे युक्तीवाद करण्यात आला.

**<u>वादप्रश्न क्र. १ करिता</u> :—**

७. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांचे मुळ अर्ज व म्हणणे यामधील मजकुर हे त्याच्या कथन व म्हणण्याचा भाग समजण्यात यावा असे या अर्जाच्या कथनात व म्हणण्यामध्ये नमुद केलेले आहे. त्यामुळे मुळ अर्ज व त्यात गैरअर्जदारांचे म्हणणे यावर दृष्टीक्षेप टाकणे आवश्यक आहे.

८. अर्जदाराच्या निशाणी क्र. १ मधील कथनानुसार गैरअर्जदार क्र. १ हा तिचा पती असुन ईतर गैरअर्जदार हे त्याचे नातेवाईक आहेत. अर्जदार हिचे लग्न गैरअर्जदार क्र. १ सोबत दि. १५/०५/२०१५ रोजी संपन्न झाले. लग्नानंतर ती गैरअर्जदारांकडे नांदवयास गेली. लग्नसंबंधातुन अर्जदाराला गैरअर्जदारापासुन एक

मुलगी नामे मैथीली झाली आहे. गैरअर्जदारांनी सुरूवातीपासुन छोटया—छोटया कारणावरून अर्जदाराला त्रास देण्यास व तुसडेपणाने वागविण्यास सुरूवात केली. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराचे चारित्रावर संशय घेवून तिला कोणशीही बोलू देत नसे व तिला मारहाण करीत होता, तसेच ईतर नातेवाईक गैरअर्जदाराचे दुसरे लग्न लावून देतो या कारणावरून अर्जदाराचा मानसिक व शारिरीक छळ करीत होते. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास दवाखाणा बांधण्यासाठी माहेरवरुन १०,००,०००/—रुपये घेवुन यावे अशी बेकायदेशीर मागणी केली व तिने त्यास नकार दिला असता तिला घराबाहेर मुलीसह काढून दिले. दिनांक १६/०३/२०२३ रोजी गैरअर्जदारांनी संगनमत करुन अर्जदाराच्या राहते घरी वाद घातला व पैसे घेवून न येता आली तर जिवाने मारुन टाकतो अशी धमकी दिली, त्याबाबत अर्जदार हिने पोलिस स्टेशन येथे रिपोर्ट दिला. गैरअर्जदारांनी अर्जदारास घरामधुन काढुन दिल्यामुळे ती बेघर झाली आहे. तिला स्वत:चे मालकीचे राहण्यासाठी कुठल्याही प्रकारचे घर नाही व कोणतीही पर्यायी व्यवस्था नाही. गैरअर्जदार क्र. १ ची आर्थिक परिस्थिती अतिशय चांगली असुन तो अर्जदाराची राहण्याची व्यवस्था करण्यास सक्षम आहे. अर्जदार तिच्या मुलीसह नाईलाजास्वत माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ ने तिचे खाणावळीची व्यवस्था व चौकशी देखील केली नाही. अर्जदार व तिची मुलगी मैथली हिला खाणपिण्याकरिता, कपडयालत्त्याकरिता, औषधपाण्याकरिता व शिक्षणाकरीता दरमहा रूपये २५,०००/— व दरमहा रूपये २५,०००/— ऐवढा खर्च लागतो. अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट, गैरअर्जदार क्र. १ हा वैदयकिय व्यवसाय करीत असुन त्यापासुन त्याला महिन्याकाठी खर्च वजा जाता रुपये २,००,०००/— तसेच त्याच्याकडे ओलीताची २० एकर शेतजमिन असुन त्यापासुन त्याला खर्च वजा जाता वार्षिक उत्पन्न रुपये २५,००,०००/— चे होते. तसेच गैरअर्जदार क्र. २ हे सेवानिवृत्त प्राध्यापक असुन त्यांना पेंशन मिळते. गैरअर्जदार क्र. ४ ते ५ हे वैदयकिय व्यवसाय करतात.

९. गैरअर्जदारांनी निशाणी क्र. १० वर त्यांचा लेखी जबाब देवून अर्जातील नातेसंबंध, विवाह दिनांक ई. मजकुर वगळता उर्वरीत मजकुर हा नाकारलेला आहे. त्यांचे अधिकचे म्हणणे असे आहे की, तो लग्नापूर्वीपासुनच त्याचे आईवडिल, भाऊ यापासुन अलग राहत आहे. त्यांचे आई वडिल चिखली येथे सर्वापासुन वेगळे

राहत असुन ते वयोवृध्द असुन वयोमानामुळे त्यांना आजार आहेत व ते पेंशनमधुन त्यांचा उदरनिर्वाह चालवितात. गैरअर्जदार क्र. १ चा भाऊ जितेंद्र हा रिसोड येथे वैदयकीय व्यवसाय करतो व त्याची पत्नी ही पुणे येथे शिक्षण घेत आहे, तसेच बहिण शितल हिचे लग्न सन २००९ मध्ये विक्रांत गोळे सोबत झाालेले असुन ती तिचे पतीसोबत केनवड येथे राहते. लग्नानंतर गैरअर्जदार क्र. १ अर्जदार सोबत मौजे चिखली येथे राहली व त्यानंतर त्याकाळातच अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ चे आईवडिलांकडून वाटणी मागा असे म्हणत असे व त्यांना अपमानीत वागणुक देत असे. त्यांनतर गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारासोबत शिवाजी वसाहत, रिसोड येथे राहावयास आला. अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ला तुझी कमावण्याची ऐपत नाही, आई वडिलांकडून पैसे घेवून ये म्हणून मानसिक त्रास देत असे.

**१०.** गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराच्या बी.ए.एम.एस च्या शिक्षणाचा खर्च त्याच्या आई वडिलांकडून पैसे मागून केला. त्या दरम्यान दिनांक १५/०९/२०१७ रोजी अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांना मैथीली नावाची मुलगी झाली. अर्जदाराचे बि.ए.एम.एस चे शिक्षण पूर्ण झाल्यामुळे मालेगांव येथील केंद्रात इंटरनलशिप म्हणुन काम करीत असुन त्यापासुन तिला मानधन मिळत असे त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार हे मालेगांव येथे राहत असे. त्यानंतर आरोग्य वर्धनी केंद्र शेगाव येथे सन २०१७ साली अर्जदार हिने ६ महिने शेगाव येथे वैदयकिय म्हणून ट्रेनिंग पूर्ण केले, त्यावेळेस गैरअर्जदार क्र. १ हा तिचे सोबत शेगाव येथे राहला व संपूर्ण खर्च वडिलांकडून उसनी रक्कम घेवून केला. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. १ सोबत ट्रेनिंग संपल्यानंतर वाद केला व तिचे आई वडिलांकडे खुडज ता. सेनगाव जि. हिंगोली येथे निघुन गेली. गैरअर्जदाराने अर्जदार हिला नांदावयास यावे म्हणुन प्रयत्न केले परंतु अपमान करुन नांदण्यास नकार दिला. गैरअर्जदाराच्या नातेवाईकानी अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये मध्यस्थी केली. त्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ सोबत रिसोड येथे भाडयाने खोली करुन मुलीसह राहत होती. काही दिवसांनी अर्जदार हिला आरोग्य वर्धीनी केंद्र शिरपुर अंतर्गत सबसेंटर शिरसाळा ता. मालेगांव जि. वाशिम येथे आरोग्य अधिकारी म्हणुन नोकरीस लागली. त्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ हे रिठद येथे राहत होते व अर्जदार ही शिरसाळा येथे नोकरी करीत असे. याकाळात अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ हा अपमानित वागणूक देत असे. अर्जदार ही गैरअर्जदारांसोबत वाद

विवाद करीत असे, आई वडिलांकडून हिस्स्याची शेती, जागेची मागणी करा असे म्हणून वाद करीत असे. अर्जदारास नोकरीपासुन दरमहा ३५,०००/— रु. महिना मिळतो. नोव्हेंबर २०२० रोजी रिठद येथे राहत असतांना अर्जदाराचे आईवडिल यांच्या सांगण्यावरुन अर्जदार ही तु संसार करण्यास योग्य नाही असे म्हणुन अपमानित करुन त्याला घराबाहेर काढुन दिले. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारस पूर्वीही व आजही सोबत राहण्यास तयार आहे. गैरअज्रदार हा बेरोजगार असुन त्याला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार ही स्वत:चा व मुलीचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. गैरअर्जदाराकडे कोणत्याही प्रकारची स्थावर मिळकत नाही, करीता अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

**११.** उभयतांच्या परस्पर विरोधी कथनाची सत्यता पडताळून पाहण्यापुर्वी उभयतांना मान्य असलेल्या बाबींचा विचार करणे गरजेचे आहे. उभयतांना मान्य असलेल्या बाबी खालीलप्रमाणे :—

१) *दिनांक १५/०५/२०१५ रोजी अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह पार पडला.*

२) *त्यांचे विवाह संबंध आजपावेतो कायम आहेत व त्यांना दिनांक १५/०९/२०१७ रोजी मैथली नावची मुलगी आहे.*

**१२.** गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केला किंवा नाही हे प्रथम दर्शनी निश्चित करण्यापूर्वी कौटुंबिक हिंसाचार (domestic violence) म्हणजे काय ते पाहणे आवश्यक आहे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये कौटुंबिक हिंसाचार म्हणजे पिडीत व्यक्तीचा कुटूंबातील सदस्यांनी केलेला शारिरीक, लैंगिक, भावनिक व आर्थिक दुर्व्यवहार होय. सदर दुर्व्यवहारापैकी एक जरी शाबीत झाला तरी पिडीत व्यक्तीचा कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे मानता येईल परंतु, प्रस्तुत अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये तुर्तातुर्त अनुतोष मिळणेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमाचे कलम २३ अन्वये अर्जदारास अथवा पिडीत व्यक्तीस तुर्तातुर्त अनुतोष मागता येतो. त्यामुळे, सदर अर्जाच्या निर्णयासाठी गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृत दर्शनी पाहणे गरजेचे आहे.

**१३.** दोन्ही बाजुचे कथन व म्हणणे यामध्ये त्यांनी परस्परांविरूध्द आरोप व प्रत्यारोप करुन परस्परांनी हिंसाचार करुन अपमानित केले याअनुषंगेची घटना नमुद केलेल्या आहेत. याठिकाणी, हे नमुद करणे गरजेचे आहे की, कैटुंबिक हिंसाचापारापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम २ मध्ये दिलेल्या व्याख्यानुसार पिडीत व्यक्ती याचा अर्थ जिचा उत्तरवादीबरोबर कैटुंबिक नातेसंबंध असेल अथवा राहला असेल अशी आणि उत्तरवादीकडून जिच्याबाबतीत कोणती कैटुंबिक हिंसाचाराची कृती करण्यात आली आहे असा आरोप करणारी कोणतीही महिला असा आहे. तर, कैटुबिंक हिंसचार मध्ये कलम ३ मध्ये असलेल्या बाबींचा समावेश होतो त्यामध्ये पिडीत व्यक्तीचे आरोग्य, सुरक्षितता, जिवीत, अवयव किंवा मानसिक व शारिरीक स्वास्थ यांना हानी किंवा क्षिती किंवा धोका पोहचत असेल तसेच तसे करण्याचा त्याचा कल असे त्यामध्ये शारिरीक, लैगिंक, शाब्दीक व आर्थिक दुर्रव्यवहार घडवून आणण्याचा समावेश होत असेल याबाबी सुध्दा अतंर्भत आहेत. प्रस्तुत अधिनियमाचा उद्‌देश हा कुटूंबात घडणा—या कोणत्याही हिंसाचारास बळी पडणा—या महिलांच्या हक्काचे प्रभाविपणे संरक्षण करणे असा आहे.

**१४.** अर्जदाराने घडलेल्या हिंसचाराअनषंगे पोलिस स्टेशन येथे रिपोर्ट दिल्याचे अर्जामध्ये नमुद केलेले आहे परंतु तिने त्याअनुषंगाची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. असे असले तरी, सदरचे कथन तिने शपथेवर केलेले आहे. अर्जातील कथनाच्या स्वरूपावरून ती सध्या गैरअर्जदार क्र.१ सोबत असलेल्या विवादामुळे ती तिच्या वेदांत रेसिडेन्सी, रिसोड माहेरी राहत आहे. सदर हिंसाचाराच्या घटनेबाबत या ठिकाणी सध्यास्थितीत खोलवर विचार करणे आवश्यक नाही. अर्जदार ही स्वतः गैरअर्जदार क्र. १ चा त्याग करुन सोडून गेलेली आहे अथवा कसे, तिचे वागण्यामुळे गैरअर्जदाराला त्रास सहन करावा लागतो किंवा लागला आहे काय हे पाहणे पुराव्याचा भाग असुन त्याबाबतची स्थिती सुनावणी अंती अभिलेखावर येणार आहे. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराने लावलेले सदर हिंसाचाराचे आरोप फेटाळले असले तरी, अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ पासुन मुलीसह वेगळी राहत असल्याने तिचा कैटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी याठिकाणी गृहीत धरावे लागेल.

**१५.** अर्जदाराने तिला दरमहा रुपये २५,०००/— व तिच्या मुलीकरीता दरमहा रुपये २५,०००/— अंतरीम निर्वाह भत्ता मिळावा, अशा प्रकारचा तुर्तातूर्त अनुतोष मिळण्याची मागणी तिने सदर अर्जात केलेली आहे. कोणत्याही स्त्रीचे लग्न झाल्यानंतर तिच्या निर्वाह भत्त्याची जबाबदारी तिच्या पतीवर असते. लग्नानंतर लगेचच पत्नीला निर्वाह भत्त्याचा अधिकार प्राप्त होतो.

**१६.** अर्जदाराच्या वतीने अभिलेखावर गट क्रमांक ९६/३/अ, ४००/१२/१३/अ चा ७/१२ उतारे व गाव नमुना आठ—अ चे डिजीटल उतारे, गट क्र.६२६/१/प्लॉट/क्रमांक/१ व ७१ चा ७/१२ चे उतारे, दिनांक २९/०३/२०२३ व २४/०५/२०२३, दु.नि.रिसोड दस्त क्र. सुची क्र. २ च्या प्रमाणीत प्रती, एकूण ६ मूळ बील, ङिगी प्रमाणपत्र. निशाणी १४ सोबत दिनांक १८/१२/२०१८ रोजीची प्रतिज्ञापत्र नोटरीची छायांकित प्रत, दिनांक ०७/०१/२०१९ रोजीचे फर्निचरचे बिल, दिनांक १८/१२/२०१८ रोजीचे इसीडेंन्ट पावती इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. गैरअर्जदाराच्या वतीने कागदपत्रे दाखल करण्यात आलेले नाहीत.

**१७.** अभिलेखावर दाखल कागदपत्राचा आधार घेवून अर्जदाराच्या वतीने गैरअर्जदार क्र. १ कडे उत्पन्नाचे पुरेसे साधन असल्याने तसेच तो वैदयकिय व्यवसाय करीत असल्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी देवू शकतो असे प्रतिपादन करण्यात आले तर, गैरअर्जदार यांच्या वतीने गैरअर्जदार क्र. १ हा त्याचे ईतर कुंटूबिंयापासून विभक्त राहत असल्याने दाखल स्थावर मिळकतीच्या कागदपत्रातील संपूर्ण मिळकत त्याचेकडे नाही. तो बेरोजगार असुन त्याला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही उलट अर्जदार हिला दरमहा ३५,०००/— रुपये आरोग्य अधिकारी या पत्राच्या नोकरीमधून पगार मिळत असून ती तिचा व मुलीचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे असा बचाव घेण्यात आलेला आहे.

**१८.** याठिकाणी, सदर युक्तीवादाच्या अनुषंगे सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता प्रथम दर्शनी असे दिसते की, गट क्र. ९६/३/अ व गट क्र. ७१ मधील मिळकत ही गैरअर्जदार क्र. २ च्या नावे गट क्र.४००/१२/१३/अ, गट क्र. ६२६/१/प्लॉट/क्र./१ मधील मिळकत गैरअर्जदार क्र. ०४ च्या नावे नोंदीत आहेत. तर, सुची भाग २ मालेगांव च्या प्रतीवरुन सन २०१८ व २०१९ मध्ये गैरअर्जदार क्र.

४ याने त्यातील नमुद प्लॉट हे खरेदी घेतल्याचे दिसुन येते. एकंदरीत सदर मिळकतीमध्ये गैरअर्जदार क्र. १ चा हक्क अथवा हिस्सा आहे किंवा कसे ही बाब सुध्दा पुराव्यानंतर अभिलेखावर येणार आहे, कारण सदर मिळकती या सध्यास्थितीत तसेच, व प्रकरण दाखल करण्यापूर्वीपासुनच गैरअर्जदार क्र. २ व ३ यांच्या नावे आहेत. तसेच गैरअर्जदार क्र. २ ते ४ हे वैदयकिय व्यवसाय करीत असले तरी कुटूंबाची जबाबदारी ही त्याचेवर आहे. अशा स्थितीत व प्रकरणाच्या या टप्प्यावर गैरअर्जदार क्र. १ च्या उत्पन्नाचा याठिकाणी विचार करणे क्रमप्राप्त आहे.

**१९.** अभिलेखावर दाखल हेमंत बूक डेपो येथील शैक्षणिक साहित्याच्या पावत्या, तसेच पोद्दार जम्बो किंड्स या शाळेची प्रवेश फी, टयुशन फी या अनुषंगेच्या व शैक्षणिक साहित्य खरेदी केल्याच्या पावत्या यावरून सध्यास्थितीत मैथीली ही अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ची मुलगी हिने शाळेत प्रवेश घेतलेला असुन ती शिक्षण घेत आहे व शिक्षणाचा खर्च हा अर्जदार हिच करत आहे हा अनुमान काढण्यास पुरेसा आहेत.

**२०.** गैरअर्जदाराच्या वतीने अर्जदार ही हिचे बी.ए.एम.एस पर्यंत शिक्षण झालेले असुन ती शिरसाळा येथे वैदयकिय अधिकारी म्हणून नोकरी करीत आहे व तिला दरमहा रुपये ३५०००/— पगार मिळतो असे म्हणणे मांडण्यात आलेले आहे व ती नोकरी करीत असल्याने तिला उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे असे युक्तीवादादरम्यान सांगण्यात आलेले आहे. याठिकाणी एक महत्त्वाची बाब नमुद करणे गरजेचे आहे की, निशाणी क्र. ११ वर अर्जदार हिने *मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रजनीश वि. नेहा या न्यायनिवाडयातील* निर्देशानुसार मालमत्ता उत्पन्न व खर्च याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यानुसार अर्जदार हिचे बी.ए.एम.एस. पर्यंत शिक्षण झाल्याचे व ती विभक्त राहत असल्याचे नमुद करुन ५०,०००/— रुपये तिला मासिक खर्च येत असल्याचे तसेच फौ. प्र. सं. कलम १२५(१) नुसार किरकोळ अर्ज क्र. ८३/२०२३ हा अर्ज दाखल असल्याचे नमुद करुन तिला मैथीली नावाची मुलगी आहे असे शपथपत्रामध्ये नमुद केलेले आहे. सदर शपथपत्रामध्ये तिच्याकडे ती नोकरीस असल्याबाबत अथवा तिला उत्पन्नाचे ईतर स्त्रोत असल्याबाबत काही नमुद केलेले नाही.

**२१.** सदर किरकोळ अर्ज क्र. ८३/२०२३ हे प्रकरण पटलावर असुन सदर प्रकरणाची या ठिकाणी न्यायिक दखल घेणे आवश्यक आहे. गैरअर्जदार याने अर्जदार ही नोकरी करीत असल्याबाबत गैरअर्जदार याने जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. वाशिम यांचा अर्जदारा हिचे नावाचा आयुष्य भारत कार्यक्रमा अंतर्गत कंत्राटी पध्दतीने आरोग्य अधिकारी या पदावर मौजे शिरसाळा, ता. मालेगांव येथे नेमणुकीचा पुर्ननियुक्ती आदेश दाखल केलेला आहे. सदर आदेशाचे अवलोकन केले असता सदर आदेशाचा कालावधी हा दिनांक १४/१२/२०२१ ते १२/११/२०२२ या कालावधीचा आहे. त्यापूर्वीही मागील कालावधी हा १४/०१/२०२१ ते ११/१२/२०२१ हा होता असे दिसुन येते. म्हणजेच, अर्जदार ही आरोग्य अधिकारी म्हणून नोकरी करीत होती ही बाब याठिकाणी स्पष्ट होते. मात्र सदरची नियुक्ती ही कंत्राटी पध्दतीने व मर्यादीत कालावधीसाठी होती. सदर कागदपत्रावरुन ती नोकरी करीत होती अथवा नोकरी करण्यास सक्षम आहे असे दिसुन येते मात्र सध्यास्थितीत ती नोकरी करते ही बाब अभिलेखावर आलेली नाही अथवा सदर नोकरीतून तिला मिळणारा पगार हा तिला व तिच्या मुलीच्या संगोपणासाठी पुरेसा आहे ही बाब अभिलेखावर आलेली नाही. सदर बाबीची स्पष्टता ही सुनावणी अंती अभिलेखावर येणार आहे.

**२२.** अर्जदार हिचे वतीने गैरअर्जदाराचे नोटरीसमक्ष केलेले दिनांक १० डिसेंबर २०१८ चे शपथपत्राची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदरच्या शपथपत्रामध्ये गैरअर्जदार क्र. १ याने त्याचा वैदयकिय व्यवसाय असल्याचे नमुद केलेला असुन त्यास दरमहा रुपये २५,०००/— उत्पन्न असल्याचे नमुद केलेले आहे, सदर शपथपत्रात गेमरअर्जदार क्र. १ ने स्वतः नोटरी समक्ष करुन दिलेले आहे. सदर शपथपत्रातील सदरचा मजकुर हा गैरअर्जदार क्र. १ हा वैदयकिय व्यवसाय करीत असुन त्यास महिना २५०००/— रूपये उत्पन्न मिळते असे गृहित धरण्यास सकृत दर्शनी पुरेसे आहे.

**२३.** अर्जदार ही तिचे माहेरी मुलीसह राहत आहे. मुलीच्या शिक्षणाचा खर्च ही अर्जदारवर आाहे. अर्जदाराकडे पुरेसे उत्पन्नाचे साधन नाही असे प्रथमदर्शनी दिसुन येते. अर्जदार ही त्याची पत्नी व मैथीली ही त्याची मुलगी असल्याने तिचा उदरनिर्वाह

भागविण्याची नैतिक जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ वर आहे. अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ कडे २० एकर ओलीताची शेत जमिन असुन त्यातुन त्याला खर्च वजा जाता वार्षिक २५,००,०००/— रूपये उत्पन्न मिळते असे कथन करीत असली तरी, वर नमुद केल्याप्रमाणे सकृत दर्शनी त्याच्यानावे शेती जमिन क्षेत्र नोंदीत नाही. ईतर गैरअर्जदार यांच्या नावे जरी शेती अथवा ईतर स्थावर मिळकत नोंदीत असल्या तरी त्याबाबतची उत्पन्नअनुषंगेची व हक्क व हिश्याची वस्तुस्थिती ही सुनावणी अंती स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सकृत दर्शनी त्यातुन सबळ उत्पन्नाचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. मात्र, तो वैदयकिय व्यवसाय करतो व त्याचे उत्पन्न किमान २५०००/— पेक्षा कमी नाही, ही बाब वर उल्लेखीत केल्यानुसार समोर आलेली आहे.

२४. आता अर्जदार हिने उदरनिर्वाहासाठी मागणी केलेली रक्कम ही संयुक्तीक आहे काय ? हे सुध्दा पाहावे लागेल. त्यामुळे, अर्जदाराची अंतरीम निर्वाह भत्त्यापोटी रूपये एकूण ५०,०००/— ची मागणी केलेली आहे. सदर मागणी निश्चितच अवास्तव व अवाजवी स्वरूपाची आहे. कारण सध्यास्थितीत गैरअर्जदार क्र. १ च्या उत्पन्नाबाबतचा निश्चित पुरावा अभिलेखावर आलेला नाही, तसेच अर्जदार हिस पुरेसे उत्पन्न मिळते हे ही असंदिग्धपणे अभिलेखावर आलेले नाही. मात्र त्याचवेळी अर्जदार हिचेसोबत मैथीली या मुलीच्या पालन पोषणाची जबाबदारी सुध्दा तिचेवर आहे हे सुध्दा दुर्लक्षित करता येणार नाही.

२५. अर्जदाराच्या वतीने दाखल मा. सवोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे हे प्रकरणाच्या साक्षी पुराव्यानंतर समोर आलेल्या वस्तुस्थिती विचारात घेवून नोंदविलेले निरिक्षणे आहेत. प्रस्तुतचा अर्ज हा अंतरिम खावटीचा असल्याने सदर प्रकरणातील तथ्य व प्रस्तुत अर्जातील तथ्य हे वेगवेगळे असल्याने सदरचे न्यायनिवाडे या टप्प्यावर अर्जदारास सहाय्यभूत ठरत नाहीत हे मी याठिकाणी मा. सवोच्च व उच्च न्यायालयाचा आदर राखून नमुद करीत आहेत.

२६. अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार ही शिक्षित असली तरी ती सध्या नोकरी करते व तिला सदर नोकरीतून मिळणारे उत्पन्न हा तिचा व तिच्या मुलीचा उदरनिर्वाहा व ईतर खर्च भागविण्यास पुरेसे असल्याचे दिसुन येत नाही.

अर्जदाराने केलेले गैरअर्जदार क्र.१ च्या उत्पन्नाच्या स्त्रोताचे कथन अविश्वासनीय गृहित धरले तरीही गैरअर्जदार क्र. १ ची जबाबदारी कमी होत नाही. वरील विवेचनावरुन अर्जदारास अंतरीम खावटी मंजुर करणे योग्य होणार आहे मात्र, अर्जदारानी केलेली अंतरीम खावटीच्या रुपये ५०,०००/— रक्कमेची मागणी पूर्णपणे मंजुर करणे योग्य व न्याय होणार नाही. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास दरमहा रुपये ४,५००/— अंतरीम निर्वाह भत्ता दिल्यास गैरअर्जदार क्र. १ चे निश्चित उत्पन्न याक्षणी न्यायालयासमोर आले नसल्याने प्रथमदर्शनी पुरेशी होईल. सबब, वादप्रश्न क्र. १ चा निष्कर्ष अशंतः होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**वादप्रश्न क.२ करिता :—**

**२७.** वरील वाद प्रश्न क्र. १ चे नोंदविण्यात आलेले निष्कर्ष व कौटुंबिक हिसांचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ या कायदयान्वये स्त्रिया व लहान मुले यांसरख्या दुर्बल घटकांचे हिसांचारापासुन संरक्षण करणे हा प्रमुख उद्देश जोपासण्याच्या दृष्टीने तसेच याठिकाणी हे सुध्दा नमुद करणे आवश्यक आहे की, फौ. प्र. सं. कलम १२५ नुसार दाखल प्रकरणात सुध्दा अंतरीम पोटगीचा आदेश करण्यात आलेला आहे, त्यामुळे सदरचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र ठरतो. सबब, वादप्रश्न क्र. २ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

**१)** अर्जदाराचा नि.क्र. ४ वरील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**२)** गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार हिस स्वतः व तिच्या मुलीकरीता प्रस्तुत अंतरिम अर्ज दाखल तारखेपासुन अंतरिम निर्वाह भत्ता/खावटी दरमहा रक्कम रूपये ४,५००/— (चार हजार पाचशे रूपये फक्त) या प्रकरणाच्या अंतिम सुनावणीपर्यंत देण्याचे या आदेशाव्दारे निर्देशित करण्यात येत आहे.

**३)** सदर आदेशाची प्रत अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी.

SHARAD NARAYAN GAVALI Digitally signed by SHARAD NARAYAN GAVALI

**(शरद ना. गवळी)**

दिनांक :— ०५.०९.२०२३. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रिसोड,
जि. वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original **Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Jr Clerk | : | **R. S. Koshti** |
| Name of court | : | Jt.C.J.J.D.& JMFC, Risod. |
| Date | : | 05.09.2023 |
| Order signed by the Presiding Officer | : | 05.09.2023 |
| **Order uploaded on** | **:** | **11.09.2023** |